Sancheti Institute for Orthopaedics and Rehabilitation's

# SIOR TODAY

For Internal Circulation Only.

NOVEMBER 2007

## Editorial...

EDITORIAL OF NEWS LETTER

With great pleasure we introduce to you all an in house NEWS LETTER of SIORieans, by SIORieans and for SIORieans.

Through this media, we wish to exchange knowledge, provide information and share jokes with each other.

Let us all sow the seeds and reap the benefits by actively contributing material which could fall under knowledge, information, jokes or for that matter anything and everything which could be of interest to SIORieans and then read it for your pleasure.

We hope this NEWS LETTER will go a long way in developing free and frank communication among SIORieans and thereby creating a strong bondage of a united close knit team with a force to reckon with.

With these few lines - here we go CHAK DE SIORieans.

# किमयागार – डॉ. के. एच. संचेती

१२ डिसेंबर १९६५ ते २००७...

१२ डिसेंबर १९६५ रोजी हॉस्पिटल आहे त्या परिस्थितीत चालवायला घेतले. आजचे जे एस.आय.ओ.आर. दिसत आहे त्यासाठी डॉ. संचेतींनी आपली सचोटी, हातोटी आणि आपली ताकद, कष्ट सर्व पणाला लावले, ते आज पाहणाऱ्याला कळणार नाही. डॉ. संचेती बद्दल काय सांगावे? हा माणूस तहानभूक विसरून कष्ट करून परिसिथतीशी झुंजत राहिला.

आजच एस.आय.ओ.आर. आणि १२ डिसेंबर १९६५ चा एस.आय.ओ.आर. यात जमीन अस्मानाचा फरक आहे. तेंव्हाच्या स्थितीबद्दल सांगुन कोणालाही विश्वास बसणार नाही. तेव्हा मोजकेच लोक कामाला होते, मी स्वत: मिसेस संचेती, मि. मदन संचेती, श्री. प्रमोद पाटील व डॉ. टेहलिया. डॉ. टेहलिया हे पण नंतर आले. सर्व भार आम्हीच संभाळले. रु. ४०/– महिना प्रमाणे मावश्या ठेवणे सुद्धा तेव्हा कठीण जायचे. जीवावर यायचे, पगाराची सर्व तरतुद करणे खुपच अवघड जायचे आम्हाला. फायदा तर बाजुलाच राहिला पण जमाखर्चाचा ताळतंत्र संभाळणेही मुश्किल व्हायचे. मी व मदनकाकांचा लोकांना अविरत चांगली सेवासुविधा पुरवण्याकडे कल होता. स्टाफमध्ये २ मावश्या, २ सिस्टर त्यात गोखले सिस्टर, २ वरच्या कामाचे लोक, त्यांचे पगार तर दयायलाच लागणार होते.

त्यातच पहिला पेशंट घेतला, फ्रॅक्चर नेक फिमर चा. ३ दिवस २ रात्र डॉ. संचेती सारखे त्या पेशंटजवळ बसुन राहिले, त्या परिस्थितीचे काय वर्णन करु मी तुम्हाला? त्या दिवसांपासुन तर आजपर्यंत अविरत काम चालुच आहे. डॉ. संचेती workoholic आहेत. प्रक्टीकल अनुभव व कामाची नशा उदाहरण म्हणुन डॉ. संचेतींकडे बघावे.

मी व मदनकाका तर विचारच करत नव्हतो की किती काम करायचे. त्यातच माझ्यावर जॉईंट फॅमिलीचे बंधन, घरातले बघुन मग हॉस्पीटल बघायचे. अगदी तारेवरची कसरत करत होते. तरीही ह्या परिस्थितीत मी मनापासून साथ द्यायची ठरविली. अगदी माझी मनीषा ९ महिन्याची असतांनाही तिला घेऊन मी हॉस्पिटला यायची. परंतु त्या कष्टातही एक आत्मिक आनंद होता. दिवस रात्र कष्टाशी झुंजत ह्या माणसाने आपली नाव झंझावातात पुढे नेली.

यात मिसेस द्वारका मोटवानींची साथ मिळाली. पहिले सहा महिन्यांचे भाडेही देऊ शकलो नाही. परंतु आले पैसे की देऊ या आश्वासनाला त्या कबुल झाल्या. आमच्यावरचा विश्वास कायम रहावा म्हणुन या माणसाने ३ दिवस हॉस्पिटल बंद ठेवून त्यांच्या मुलीच्या लग्नात संख्या भावाप्रमाणे दिवसरात्र काम केले. एखादा सख्या भाऊही करणार नाही एवढे काम केले. त्याचे वर्णन करायला माझ्याकडे शब्दच नाहीत. तेंव्हा मिसेस मोटवानीला कळुन चुकले की हा मुलगा माझे हॉस्पीटल नीट चालवेल व पैसे बुडवणार नाही.

हे सर्व करताना, हजारो गोष्टींना तोंड द्यावे लागले. अंधाऱ्या काळोखातुन वाट काढायला लागली तेव्हा आजचे हे एस.आय.ओ.आर. चे स्वरुप तुम्हाला दिसत आहे. हॉस्पिटल म्हणजे एक ना हजारो प्रश्न उद्‌भवत असतात. त्या झंझावातात आपली नाव वल्हवत वल्हवत पुढे नेली. मदनकाकांना सर्व व्यवस्था बघावी लागत असे. सेक्रेटरी+असिस्टंट+बाकी विभाग अशी ऑल इन वन धुरा सांभाळावी लागत होती. मि. प्रमोद पाटील सर्व थिअेटर जॉब आणि इतर काम संभाळत होतो.

पहिल्या ७२ वर्षांच्या करमाळ्याच्या आजींनी तर आमच्या बरोबर डॉ. संचेतीचीही परिक्षाच पाहिली. पण त्याही परिक्षेत डॉ. संचेतींनी चांगल्या तऱ्हेने पास होऊन दाखवले. प्रत्येक सिनियर ॲनॉस्टेटीस सुद्धा म्हणत होते, संचेती ही केस घेऊन तु बरे केले नाहीस. पण डॉ. संचेतींचे एकच ठाम उत्तर होते. 'ही केस मी जिंकलो तर प्रॅक्टीस करेन नाही तर मेडीकल प्रॅक्टीस सोडुन देईन' पण तशी वेळ आली नाही व ती केस चांगली झाली. तेव्हापासून आजपर्यंत यश मिळतच गेले. मी, प्रमोद पाटील ऑपरेशनला मदत करायचो, ट्रॉली लावण्यापासुन सर्व आम्ही करायचो, ह्याचे धडे मी के.ई.एम. नर्सिंगमध्ये घेतले होते.

मोटवानी नंतर आम्ही ठुबे पार्कला आलो. तिथे एका बिल्डींगमध्ये हॉस्पीटल सुरु केले. अशा चढत्या क्रमाने यश मिळत गेले. आताच्या आणि मागच्या परिस्थितीत जमीन अस्मानाचा फरक आहे. आता हे हॉस्पिटल प्रत्येक हाडांच्या मशिनरीने सुसज्ज आहे. अमाप स्टाफ, सिस्टर्स, डॉक्टर्स, वार्डबॉईज, मावश्या, अकांटस् स्टाफ, रिसेप्शनीस्ट, टेलिफोन ऑपरेटर्स, मेडीकल स्टोअर्स, काय नाही ते विचारा?

सर्व काही सुसज्ज स्थितीत आणणारा आपल्या कष्टाने रात्रंदिवस झगडून पुढे जाणारे किमयागार म्हणजे डॉ. के.एच.संचेती. आम्ही सर्वजण त्यांच्यामागे उभे राहुन त्यांचा बॅक बोन संभाळण्याचे काम करतो. आणि एक पॉईंट सांगायचा म्हणजे इंडस नी जॉईंट ६ वर्ष सतत रात्रदिवस झटुन आपली स्वत:ची इंडस इंडस्ट्री उभी करणारे एकमेव व्यक्तीमत्व म्हणजे माझे पतिराज डॉ. संचेती, जेथे कर माझे जुळती. या उक्तीचा प्रत्यय डॉ. संचेंतीकडे बघितल्यावर येतो. ज्या माणसाकउे साधी सायकल मिळणे मुश्किल त्या माणसाकडे आता सरस्वती व लक्ष्मी या दोघीजणी सेवेसाठी तत्पर आहेत. त्यांची महीमा काय सांगावी, सांगु तेव्हढी थोडीच आहे.

माझी मुले डॉ. पराग संचेती, मनीषा, सोनल, रुपल सर्व जावई असा अतिशय आनंदी व सुखी संसार आहे. आमची जॉईंट फॅमिली वाखणण्यासारखी आहे. सर्वजण डॉ. संचेतींना विचारल्याशिवाय एक गोष्ट करत नाहीत. आता परागला माझे एवढे सांगणे आहे की, आता आपल्या पपांच्या कष्टाचा धुरा आपल्या खांद्यावर घ्यावा. मनीषाने मॅनेजमेंट सांभाळण्याची जबाबदारी घेतली ती शेवटपर्यंत चांगल्या तऱ्हेनी सांभाळावी.

सर्व स्टॉफ यांना माझे एवढेच म्हणणे आहे की, या सर्वांनी आजपर्यंत जे सहकार्य दिले ते तसेच यापुढेही देत रहावे. व या एस.आय.ओ.आर. च्या फॅमिलीत गुण्यागोविंदाने नांदावे. ही परमेश्वरचरणी प्रार्थना.

ऐसा मकान खरिदना है,
जहाँ मैत्रीभाव का पलंग हो,
कोमल हृदयका फव्वारा हो,
औचित्या पालन की कुर्सी हो,
प्रसन्नता का सोफासेट हो,
आत्मनिरिक्षण का टी.व्ही हो,
ऐसे फर्नीचर से सुसज्ञ मकान चाहिए
किमत का कोई प्रश्न नही
संपर्क साधे । घर मिल गया, संचेती हॉस्पिटल

**– सौ. ए. के. संचेती**



## Jokes

1. This is from Oracle Bangalore: From an employee who was performing the " Mundan" ceremony of his 10 year old son: "As I want to shave my son's head, please leave me for two days..."

2. From H.A.L. Administration Dept: "As my mother - in - law has expired and I am only one responsible for it, please grant me 10 days leave."

3. Another employee applied for half day leave as follows: "Since I've to go to the cremation ground at 10 O-clock and I may not return, please grant me half day casual leave."

4. A candidate's job application: "This has reference to your advertisement calling for a Typist and Accountant - Male or Female'...As I am both (!!) for the past several years and I can handle both with good experience, I am applying for the post.

From
**Heena Shaikh**

## आयुष्य

**आपल्या आयुष्याची रांगोळी**
**कोणाच्याही दारात रंगवयायची नसते**
**आपल्या जीवनाचा सडा**
**कोणाच्याही दारात शिंपडायचा नसतो**
**भविष्याचं तोरण**
**अनामिक दारांना बांधायची नसतात**
**वेचून ठेवलेली हास्याची फूलं**
**आपल्याच अंगणात उधळायची**
**असतात.**

## CHUTKULE

A WIFE IS LIKE A COMPUTER,
SHE WILL "ENTER" UR LIFE,
"SAVE" U IN HER HEART,
"FORMAT" UR BRAIN,
"EDIT" UR LIFE,
AND THEN "DELETE" U FROM
UR MONEY!!

# सोबत

कुणाच्या इतक्याही जवळ जाऊ नये की,
आपल्याला त्याची सवय व्हावी.
तडकलेच जर हृदय कधी,
जोडताना असह्य यातना व्हावी.
डायरीत कुणाचे नाव इतकेही येवू नये,
की पानांना ते नाव जड व्हावे.
एक दिवस अचानक त्या नावाचे
डायरीत येणे बंद व्हावे.
स्वप्नात कुणाला असही बघू नये,
की आधाराला त्याचे हात असावे.
तुटलेच जर स्वप्न अचानक
हातात आपल्या काहीच नसावे.
कुणाला इतकाही वेळ देवू नये,
की आपल्या क्षणाक्षणावर त्याचा अधिकार
व्हावा.
एक दिवस आरशासमोर आपणास
आपलाच चेहरा परका व्हावा.
कुणाची इतकीही ओढ नसावी,
पदोपदी वाट बघता बघता
आपलीच वाट दिशाहीन व्हावी.
कुणाचे इतकेही ऐकू नये,
की कानात त्याचाच शब्दांचा गुंजाव
आपल्या ओठातून मग,
त्याचाच शब्दाचा उच्चार व्हावा
कुणाची अशीही सोबत असू नये
की प्रत्येक स्पंदनात ती जाणवावी
ती साथ गमवण्याच्या केवळ भीतीने
डोळ्यात आसवं जमावीत.
कुणाला इतकही माझं म्हणू नये,
की त्याचे मी पण आपण विसरुन जावे
त्या संभ्रमातून त्यानं आपल्याला
हेच देऊन जागे करावे
पण.... पण....
कुणाच्या इतकही दूर जाऊ नये की
आपल्या सावलीशिवाय सोबत काहीच
दूर-दूर आवाज दिला तरी
आपले शब्द जागीच घुमावे

**Miss. Supriya S. Jagtap**
(O.T. Store)

## कानामागुन आली

सुख दु:खाच्या चौकटीवरी
घर उभे राही
रुसण्या फुगण्याविना
घराला घरपण नाही
माया ममता जेथे
बहरुन आली
मंदिराची शोभा
घरास दिसली
कानामागुन आली
अन तिखट झाली
तनामनाची नाती
येथे जुळली
आसु अन आसुची
मैफिल जमली
कानामागुन आली
अन् तिखट झाली.

**Diksha Bhure**
(O.T. Store)

# NURSING PROFESSION



Nursing profession is a noble profession. In olden days it was purely Christians who were in this profession and were known as NUNS. They were unmarried single striving for the betterment of humanity.

They were attached to Christian missionery and they were worshiped like god for their selfless service to needy patients. They have long been seen as offering a noble service to the society and their commitment to a human cause , giving them an exalted status.

As the time changed, people from all castes and creed started developing a liking for nursing profession. We have large nursing institutions scattered through out the world.

However when other people started entering this profession, it totally got changed and now it has become commercialised. People from this nursing profession, throwing away ethics, not only see as a money spinning activity, their attitude towards humanity has changed. There may be very few, who can be counted on the finger tips and who really serve needy people without expecting any returns.

When entering into nursing profession, which one chooses out of his own will, one has to have a nursing oath. He or she pledge himself/herself to concentrate his/her life to the service of humanity.

Looking at the present scenario, where the profession has undergone a sea of change and is looked down upon, various attempts are made by few people in this profession to uphold the noble profession.

I think there should be an association of nursing professional who should issue guideline about the code of conduct to be observed and imply that the responsibilities of the nurse is to participate in activities with the purpose of improving both the health and well being of the individual, in particular, and the community at large.

**Mrs. P. V. Nair**
Matron

# BELIEVE ITS FACT!!!

Whenever I find the key to success,
Someone changes the lock.

The road to success??....
Is always under construction.

Everyone has a scheme of getting Rich?......
which never works.

If at first you don't succeed?
Destroy all evidence that you Ever tried.

You can never determine which side of
The bread to butter. If it falls down,
It will always land on the buttered side.

As soon as u mention something??
If it is good, it is taken? If it is bad it happens.

He, who has the gold, makes the rules
Murphy's golden rule.

If you come early, the bus is late,
if You come late?? The bus is still late.

Once you have bought something,
you will find the same item being sold
Somewhere else at cheaper rate.

If you have paper, you don't have a Pen?
If you have a pen, you don't Have paper??
If you have both, No one calls.

You will pick up maximum wrong Numbers
when on roaming.

If your exam is tomorrow,
There will be a power cut tonight.

Irrespective of the direction of Wind,
the smoke from cigarette will always
tend to go to the non-smoker.

**- BY NAZIA FAROOQUI.**
(Health Check-up dept.)

# My Experience in SIOR

I arrived in "Sancheti Hospital" on 11 Sep. 06 as a nursing Superintendent. It is a very beautiful and impressive hospital. I have nearly 25 yrs of experience in different hospitals.

On arrival I had mixed feeling in my heart. Like will all accept me ? There are owners, superiors and also subordinates and juniors. But very soon I was accepted by all. Our director is a soft speaking person who is very impressive and very hard working. But what I admire most is, the entire Sancheti family, simple & down to earth.

I also met our Director Administrative Officer. The most beautiful and understanding person with whose understanding nature has helped a new person like me to cope up with the new surroundings. That is our Manisha Madam. I simply love her and do my best to please her with my work.

Life of Sancheti Hospital is KHS Sir. I have a very good fortune to go on morning rounds with him and his subordinate doctors. I am yet to meet a Doctor who always have a winning smile for all patients whether they are in Super Deluxe or in General Ward. Patients are hungry to see him for his word of encouragement. Since I am all the time associated with patients I hear their comments like, "The moment we see Dr. K. H. Sancheti Sir, most of our fears vanish." In his busy life he always laughs and jokes with patients, pats their backs and in a most humble way, joining his palm greets every patient. I really respect Dr. KHS form my heart. When patients tell him that he is like a GOD to them I really feel proud of myself for getting an opportunity to work in this hospital.

I also had an opportunity to meet Mrs. K. H. Sancheti. Beautiful even now. I heard lots of things about her. How hard she worked to bring the hospital to this stage.

All Sancheti Hospital consultants, Residents, Senior Officers, staff are dedicated and hard working.

Last but not the least, our Maushi's, Mama's and Sweepers also contribute to the success of Sancheti Hospital Family and I am proud to be a part of that family.

**- J. D. Sane**
Nur. / Supdt.

# TIME

- If you have half an hour to spare don't spare with someone who hasn't.
- It takes less time to do a thing right than to explain why you did it wrong.
- The time men spend in trying to impress others, they could spend in doing the things by which others would be impressed.
- Time conquers all and we must obey time.
- Time is nature's way of preventing everything from happening at once.
- Time and tide wait for no man.
- The shortest way to do many things is to do only one thing at a time.
- Remember that time is money.
- If you are trying to kill time, always make sure it is your own.
- You can fool all the people some of the time but you can fool yourself all the time.

A WELL WISHER

# बाप

आई घराचे मांगल्य असते, तर बाप घराचं अस्तित्व असतो. पण घराच्या या अस्तित्वाला आम्ही कधी समजून घेतलेलं आहे का? वडीलांच महत्त्व असूनही त्यांच्याविषयी जास्त लिहिलं जात नाही; बोललं जात नाही, कोणाही व्याख्यानात आईविषयी बोलत राहतो. संत महात्म्यांनी आईचंच महत्व अधिक सांगितलेलं आहे. देवादिकांनी आईचेच गोडवे अधिक गायले आहेत. लेखकांनी, कवींनी आईचेच तोंडभरून कौतून केलं आहे. चांगल्या गोष्टींना आईचीच उपमा दिलेली आहे, पण बापाविषयी कुठेच फारसं बोलंल जात नाही. काही लोकांनी बाप रेखाटला; पण तोही तापट, व्यसनी, मारझोड करणाराच. समाजात एक–दोन टक्के बाप असे असतीलही, पण चांगल्या वडीलांबद्दल काय?

आईकडे अश्रूंचे पाट असतात पण बापाकडे संयमाचे घाट असतात. आई रडून मोकळी होते, पण सांत्वन वडीलांनाच करावे लागते आणि रडणाऱ्यापेक्षा सांत्वन करणाऱ्यावरच जास्त ताण पडतो कारण ज्योतीपेक्षा समईच जास्त तापते ना ! पण श्रेय नेहमी ज्योतीलाच मिळत राहते ! रोजच्या जेवणाची सोय करणारी आई लक्षात राहते पण आयुष्याच्या शिदोरी करणारा बाप आम्ही किती सहजपणे विसरू शकतो, सर्वांसमोर आई मोकळेपणी रडू शकते, पण रात्री उशीत तोंड खुपसून रडतो, मुसमुसतो तो बाप असतो. आई रडते, बापाला रडता येत नाही. स्वत:चा बाप वारला तरी त्याला रडता येत नाही – कारण छोट्या भावंडांना जपायचं असतं. आई गेली तरी रडता येत नाही कारण छोट्या बहिणींची आई व्हायचं असतं. पत्नी अर्ध्यावरच सोडून गेली तरी पोरांसाठी अश्रूंना आवर घालावा लागतो.

जिजाबाईंनी शिवाजी घडवला असं अवश्य म्हणावं पण त्याचवेळी शहाजी राजांची ओढाताण सुद्धा ध्यानात घ्यावी. देवकीचं, यशोदेचं कौतुक अवश्य करावं पण पुरातून पोराला डोक्यावर घेऊन जाणारा वासुदेव सुद्धा लक्षात ठेवावा. राम हा कौसल्येचा पुत्र अवश्य असेल पण पुत्रवियोगाने तडफडून मरण पावला तो पिता दशरथ होता.

वडिलांच्या टाचा झिजलेल्या चपलांकडे पाहिलं की त्यांच प्रेम कळतं. त्यांच फाटकं बनियन बघितलं की कळतं, '' आपल्या नशिबाची भोकं त्यांच्या बनियनला पडलीत.'' त्यांचा दाढी वाढलेला चेहरा त्यांची काटकसर दाखवतो, मुलीला गाऊन घेतील, मुलाला लुंगी घेतील पण स्वत: मात्र जुनीच पँट वापरतील मुलगा सलूनमध्ये २०–२५ रू. खर्च करतो, मुलगी पार्लरमध्ये खर्च करते पण त्याच घरातला बाप मात्र दाढीचा साबण संपला म्हणून आंघोळीच्या साबणाने दाढी करतो. अनेकदा तो नुसत्या पाण्याने दाढी करतो. बाप आजारी असला तरी लगेच दवाखान्यात जात नाही, तो आजाराला घाबरत नाही पण डॉक्टर एखादा महिना आराम करायला सांगेल याची त्याला भिती वाटते. कारण पोरीचं लग्नं, पोराचं शिक्षण बाकी असतं. घरात उत्पन्नाचं दुसरं साधन नसतं, ऐपत नसते तरीही मुलालां मेडिकल, इंजिनिअरिंगला प्रवेश मिळवून दिला जातो, ओढाताण सहन करून मुलाला दर महिन्याला पैसे पाठवले जातात. पण सर्वच नसली तरी मुलं अशीही असतात की जी तारखेला पैसे येताच मित्रांना परमिट रूममध्ये पार्ट्या देतात व ज्या बापाने पैसे पाठवले त्याचीच टिंगल करतात. एकमेकाला एकमेकाच्या बापाच्या नावाने हाका मारतात.

ज्या घरात बाप आहे त्या घराकडे कोणीही वाईट नजरेने बघू शकत नाही. कारण घरातला कर्ता जिवंत असतो. तो जरी काहीही करत नसला तरही तो त्या पदावर असतो आणि घरच्यांच कर्म बघत असतो, सांभाळत असतो. कोणाचा मुलगा होणं टाळता येत नाही पण बाप होणं टाळता येतं. पण बाप कधीच बाप होण्याचं टाळत नाही. आईच्या असण्याला अथवा आई होण्याला बापामुळेच अर्थ असतो.

कोणत्याही परिक्षेचा निकाल लागल्यावर आई जवळची वाटते कारण ती जवळ घेते, कवटाळते, कौतुक करते. पण गुपचुप जाऊन पेढ्यांचा पुडा आणणारा बाप कोणाच्याच लक्षात रहात नाही. पहिलटकरणीचं खूप कौतुक होतं पण हॉस्पिटलच्या आवारात अस्वस्थपणे फेऱ्या मारणाऱ्या बाळाच्या बापाची कोणीही दखल घेत नाही.

चटका बसला, फटका बसला, ठेच लागली तर 'आई गं' हा एकच शब्द तोंडातून बाहेर पडतो पण रस्ता पार करताना एखादा ट्रक अगदी जवळ येऊन ब्रेक लावतो तेव्हा 'बापरे' हाच शब्द बाहेर पडतो. छोट्या संकटांसाठी आई चालते पण मोठी–मोठी वादळं पेलताना बापच आठवतो. काय, पटतयं ना?

कोणत्याही मंगलप्रसंगी घरातील सर्वजण जातात. पण मयतीच्या प्रसंगी बापालाच जावं लागतं. कोणताही बाप श्रीमंत मुलीच्या घरी जास्त जात नसतो पण गरीब लेकीच्या घरीमात्र उभ्या उभ्या का होईना चक्कर टाकतो. तरूण मुलगा रात्री उशिरा घरी येतो तेव्हा जागा असतो तो बापच. मुलाच्या नोकरीसाठी साहेबापुढे लाचार होणारा बाप, मुलीच्या स्थळाकरता उंबरठे झिंजवणारा बाप, घरच्यांसाठी स्वत:च्या वेदना दडपणारा बाप... खरंच, किती ग्रेट असतो बाप !

वडीलांचं महत्त्व कोणाला कळतं? लहानपणीच वडील गेल्यावर अनेक जबाबदाऱ्या खूप लवकर पेलाव्या लागतात, एकेका वस्तुसाठी तरसावं लागतं, तेव्हा, वडीलांना खऱ्या अर्थानं समजून घेते ती म्हणजे मुलगी. सासरी गेलेल्या अथवा घरापासून दूर असलेल्या मुलीला बापाशी फोनवर बोलताना बापाचा बदललेला आवाज क्षणात कळतो. ती अनेक प्रश्न विचारते. कोणतीही मुलगी स्वत:च्या इच्छा बाजूला ठेवून बाप म्हणेल तेव्हा विवाहाच्या बोहल्यावर उभी राहते. मुलगी बापाला जाणते, जपते. इतरांनी सुद्धा असंच आपल्याला जाणावं हीच बापाची किमान अपेक्षा असते.

**गोविंद झाडगे**

हाऊस किपिंग – इन्चार्ज

# ओझ होतं का.... ?

तेव्हा मी माझ्या पोस्ट ग्रॅज्युएशनच्या शेवटच्या सेमिस्टरला होते. माझ्या प्रोजेक्टसाठी कच्च्या मालाची तयारी करायला मार्केटमध्ये चालले होते. थोडं चालून गेल्यावर मोठा रस्ता ओलांडायला एका बाजूला उभी असताना हळूच माझ्या कानाजवळ कुणीतरी पुटपुटलं ''बाळ एवढा रस्ता ओलांडून देशील?'' उंच बांधा, जवळ–जवळ ऐंशीच्या आजू–बाजूच्या वयाच्या त्या आजी होत्या. मी अलगद त्यांचा हात धरला आणि रस्ता ओलांडायला सुरवात केली.

माझं पूर्ण लक्ष त्या आजींच्या शरीराची हालचाल आणि गाड्यांचा गोंधळ याकडेच होतं. खुप वेळाने रस्ता ओलांडला आणि त्या आजींना झटकन विचारल ''तुम्हाला कुठे जायचय''? त्यांनी माझ्या माहीतीतला मात्र थोडा दूरचा पत्ता सांगितला. आणि मला प्रश्नच पडला की त्या घरापर्यंत एकट्या कशा काय जातील?

कारण, त्या बांध्याने जरी उंच–ताठ वाटत होत्या. तरी शरीराने आतून फार खचलेल्या मला जाणवल्या, रस्त्यावरून चालताना त्यांच्या दोन पावलातील अंतर आणि मनात असलेली असुरक्षतेची वेगळी भीती दिसून येत होती. मी त्या आजीना मोकळेपणाने सांगितल की, ''मी तुम्हाला तुमच्या घरी सोडते, तुम्ही अजिबात काळजी करू नका.'' हे ऐकल्यावर त्या थोड्याशा निश्चींत झालेल्या दिसल्या आणि मला मध्येच एखाद–दुसरा प्रश्न विचारत होत्या.

तु कुठे रहातेस? काय शिकतेस? मात्र मी त्यांना एकच प्रश्न विचारला, '' इतक्या उतार वयात आजी तुम्ही कुठे गेला होता''? त्यावर त्यांनी सांगितलं दर गुरुवारी किंवा जेव्हा मला सोबत मिळेल तेव्हा मी इथल्या रामकृष्णाच्या देवळात भजनाला येते. तेवढाच वेळ जातो आणि समाधान वाटतं. आम्ही दोघीपण त्यांच्या घराच्या आजुबाजूच्या परिसरात आलो आणि मी त्यांना विचारल की तुमच घर कुठे आहे. त्यावर त्यांनी बाजूच्या वाड्याकडे बोट दाखवून ''त्या वाड्यात'' असे उत्तर दिले.

मी त्यांना वाड्यापर्यंत सोडून निघते अस सांगितल, आणि त्या ऐकायलाच तयार होईनाशा झाल्या. मला घरी चल म्हणून आग्रह करायला लागल्या. दोन–तीन वेळेला मी त्यांना नाही म्हणून सांगितलं तर म्हणाल्या ''तू वाड्यापर्यंत मला आणून सोडलस, हल्लीच्या मुलांना स्वत:च्या आजी–आजोबांसोबत बाहेर जायला पण लाज वाटते.'' आणि तु जर माझ्या घरात नाही आलीस तर मला वाईट वाटेल गं !'' एवढ बोलून त्यांनी त्यांच्या चंची–पिशवीतून छोटी कील्ली बाहेर काढली ती पाहून मला दोन मिनीटं काही कळलच नाही, आजींनी घराला कुलूप लावलय? म्हणजे यांच्या घरी कुणीच नसेल? एकट्या रहात असतील...? असे अनेक प्रश्न...

मला मनात थोडी भीती वाटत होती पण मग त्या आजींच मन तरी कस दुखवणारं? वाडा थोडा हवेशीर–नीट–नेटका होता, लहान मुलं–माणसांची खूप चाहूल होती. मी त्यांना जीन्यावरून हात धरून चढून वर नेल, जाता–जाता त्यांनी खालच्या घरातल्या कुणा एका ''सुमन'' नावाच्या बाईला हाक मारून सांगितल ''सुमे आज संध्याकाळचा डबा नको देऊ बाई, दुपारचंच अजून माझ संपल नाहीए''. त्यांच्या या संभाषणाने माझ्या मनातल्या प्रश्नांचे अनेक उपप्रश्न तयार झाले, आणि मी फार गोंधळून गेले.

शेवटी त्यांच्या खोलीच्या बाहेर येऊन आम्ही दोघी उभ्या राहीलो. दारापुढे गॅलरी होती. पण ती सुरू होताच संपेल एवढ्या अंतराची. आम्ही कुलुप उघडून आत गेलो आणि आत गेल्यावर मला सगळ कळून चुकलं...

समोरच एका रुबाबदार माणसाचा फोटो लावलेला होता आणि त्याला सुंदर पारिजातकाच्या फुलांचा हार घातला होता. त्याचा मंद दर्वळ खोलीच्या आतल्या कडांना येत होता. खोलीची जमीन म्हणून लाल रंगाचा कोबा टाकलेला होता. त्याचा थंडगार स्पर्श पायाच्या तळव्यांना इतका चालून आल्यावर थकवा दूर करतं होता. एका बाजूला छोटी लाकडी खाट लावलेली होती आणि तिच्यावर अगदी मऊ, सुती आजींनी स्वत:च पांढर शुभ्र, अबोली रंगाची छोटी फुल असलेल पातळ अंथरल होतं.

ते घर दोनच खोल्यांच होतं. त्यांनी स्वयंपाक घरात जाऊन माझ्यासाठी चहा ठेवला आणि मला 'इकडे येऊन बस ना'' अशी हाक दिली आणि मी त्यांच्या बाहेरच्या खोलीला आणि स्वयंपाक घरात जोडणाऱ्या दरवाजाच्या उंबऱ्यावर जाऊन बसले. त्यांचा गॅसही खालीच मांडलेला होता. चहा बनवून झाला... आणि तो पिता–पिता मी माझ्या मनात असलेल्या सगळ्या प्रश्नांची आणि उपप्रश्नांची त्यांच्यावर सरबत्तीच सुरु केली...

तेव्हा कळलं... त्यांना दोन मुल होती दोघही मुलगे व्यवस्थित शिकून इंजीनिअर झाले, त्यांच मुळ गाव औरंगाबादला, एकामागोमाग एकाचे लग्नही झाले, एक मुलगा नाशिकला आणि एक मुलगा बेळगावला स्थाईक झाले. त्या आजींचे यजमान फारच पूर्वी पुण्यात आले होते बदली निमित्त तेव्हा त्यांनी त्या वाड्यात ती खोली विकत घेतली होती. दहावर्षांपूर्वीच त्या आजोबांच निधन झाल होत आणि शेवट... त्या आजी इथेच पुण्यात एकट्या रहात होत्या.

मी सहजच त्यांना विचारल... तुमच्या मुलांनी तुम्हाला नाही नेल त्यांच्या घरी ? किंवा तुम्ही का नाही जात स्वत: त्यांच्याकडे ? यावर त्या आजींनी दिलल उत्तर ऐकून पूर्वा वातावरणात एक स्तब्धता निर्माण झाली.

त्या म्हणाल्या ''जात होते गं मी दोघांकडेही सहा–सहा महिने पण मला सुद्धा खूप थकायला होते रे? नंतर एकट्याने प्रवास करण जमेनास झालं. पण काहीही म्हण त्या दोघांकडे मला कधी गमलच नाही.'' मग मी सुद्ध त्यांना म्हटल... ''तुम्हाला इथे एकट्यांना खानावळीच जेवण, मन मोकळं करायला कुणी नाही'' कस काय राहू शकता तुम्ही?

त्यावर त्या किंचीत हसून म्हणाल्या ''माझ्या जुन्या आठवणी आहेत इथे, मी माझ्या यजमानांसोबत माझं आयुष्य इथं पुण्यात घालवल. त्यामुळ मला रमायला आणि जो पर्यंत मी जीवंत आहे तोपर्यंत सोबतीला ही खोलीच पुरेशी आहे !''

त्यांच्या या उत्तरावर सामान्य माणसानं काय विचार करावा.... उगाचं मुलांच्या संसारात कशाला जा? त्यांच–त्यांच आयुष्य जगुदे त्यांना माझी काहीही तक्रार नाही. असेही त्या म्हणाल्या...

हे ऐकून मी अजूनच थक्क झाले. हळू–हळू अंधार चढत होता, त्यामुळे मी घाई–घाईने त्या आजींना टाटा करायला उठले आणि वाटल एकदा त्यांच्या पायांना स्पर्श करावा वाकून. त्यांनी दुधावर येते तशा सायीसारखे पा–– आलेला हात हळू माझ्या डोक्यावर फीरवला आणि एक पेन देऊन म्हणाल्या त्या कॅलेंडरच्या पानावर तुझं नाव लीहून जा. मला लक्षात रहाणार नाही ना म्हणून...

त्या दारात उभ्या होत्या. बदामगराच्या सालीसारखा त्यांचा रंग होता आणि तशाच सुरकुत्या चेहेऱ्यावर होत्या. डोळ्यांचा पांढराशुभ्र रंग थोडा निस्तेज पडला होता. मी वाड्याच्या मुख्य दरवाजा पार करून जाईपर्यंत त्या माझ्याकडे पहात होत्या...

त्यांच्या थकलेल्या शरीरात, आठवणींनी भरलेलं कणखर मन होतं.....

दाराशी उभं राहून त्या काय विचार करतहात्या ... कोणास ठावुक?

**श्वेतांबरी**
**श्वेता शिंदे**

# तो पूल...

त्या वाटेवरल्या आठवणी माझ्या
फार जुन्या – जुन्या आहेत.
सकाळच्या जाताना टवटवीत भाज्यांशी
अन् परतताना भेळेच्या गाड्याशी
मारलेल्या गप्पा आहेत.

त्या पुलाशीच माझ नात का जडलं ?
जरी रस्ता पार मोठा होता...
कारण त्या रस्त्याला माझी ओढ नव्हती
मात्र पुल माझ्या भेटीला वेडा होता.

पावसाळी दुथडी भरून वाहणारी नदी.
त्याला भेटायला येऊ पाही
मग मी कशी भेटणार... ?
या विचाराने पुलही दु:खी होई

हिवाळ्यातल्या बोचणाऱ्या वाऱ्यातही...
मी त्याला सोडले नव्हते...
टपरीवरल्या कडकडीत चहाच्या ग्लासाचे
आम्ही एकत्र पेग मारले होते.

माझी त्याला अन् त्याची मला
खुपच साथ होती
रात्रीचा मध्य गाठेपर्यंत बसून
मारलेल्या गप्पांची भेट मी त्याला दिली होती.

थोड्या दिवसांनी माझी
पायवाटच बदलून गेली
पुलाची अन् माझी भेटही विरळ झाली

निघून गेल्यावरही मी
तिथून खूप सारे आले गेले
प्रत्येकाच्या येण्या–जाण्यात
तो मात्र अजूनही माझी वाट पहात आहे.

**– श्वेतांबरी**
**– श्वेता शिंदे**

# पुन्हा फुटेल पालवी...

आयुष्य इतकं छोटं कधीच नसतं, की एखाद्या आघातानं सार संपुन जाव, आयुष्याच्या कापलेल्या फांद्यांनाही फुटते कधी ना कधी पालवी.

सुख दु:खाच्या झुल्यावर झुलत असतं आयुष्य आशा निराशेच्या हिंदोळ्यावर हिंदळत असतं आयुष्य, रुपेरी स्वप्नांनी बहरत जात आयुष्य, कधी स्वप्न भंगाच्या दु:खानं उद्ध्वस्त होत आयुष्य.

आयुष्य, कधी उमलणाऱ्या कळीसारखं, कधी कोमेजलेल्या निर्माल्यासारखं, आयुष्य ओल्या मातीतुन अंकुरणार, इवल्याश्या रोपातुन बहरणार, चांदण्यांचा रात्रीबरोबर पोसत जातं आयुष्य.

उनंसावल्यांच्या खेळाबरोबर पीसत जात आयुष्य बहरत जाणाऱ्या आयुष्याला मिळत जात भावनाचं खत पाणी आणि ऐसपैस पसरत जातं आयुष्य डेरेदार वृक्षासारखं....

एखाद्या काळरात्री स्वार्थाची एखादी कुऱ्हाड छाटुन टाकते वृक्षाच्या एक एक फांद्या, पानापानांची डहाळी सगळी संपते एका क्षणात उरतं फक्त न पेलवणारं सरलेपणाचं ओझ आणि हो ! या सरलेपाणातुन पुन्हा एक आयुष्य सुरु करण्याची उमेद पुन्हा पालवण्याची जिद्द.

आकांक्षा उंच असल्या की गगन सुद्धा ठेंगणं पडतं, पुन्हा भरारी घ्याच्या या आकांक्षा अशाच उंच उंच, अशाच उत्तुंग येतेय मग एखादी श्रावणारी. कधीतरी, अन सोबत कोवळ्या किरणांची रेशमी ऊब, ही पालवणाऱ्या किरणांना मिळत जाते साथ, अशा एक एक किरणांची अन ऐकाका रिमझीम सरीची, कधीतरी पुन्हा फुटतो कोंब या जिद्दीतुन पानवतं एखादं पान, याच उध्वस्त आयुष्याच्या वृक्षावर पुन्हा एकदा फुलत जातं, बहरत जातं आयुष्य पालवण्याच्या उभारीतुन साकार होत पुन्हा एकदा नवं आयुष्य, काळजात असुद्यात भुतकाळाच्या खोल जखमा, पण अंगात असु दे उमेद जिद्दीनं नवं आयुष्य सुरु करण्याची आणि कापलेल्या पंखात ही भरसरी घेण्याचं बळ निर्माण करणारी.

संपल्या दिशा जरी साऱ्या वाट शोधेन, तुटलेल्या फांदीवर पुन्हा नवीन पालवी फुटेन .

# TEN GOLDEN RULES TO BE HAPPY WITH THE WORK YOU DO

1) **Choose your Attitude:** There is always a choice about the way you do your work, even if there is not a choice about the work itself. We can choose the attitude we bring to our work. You can have a moody attitude and have a depressing day. You can bring in a grouchy attitude & irritate your co-workers & friends. OR you can bring a sunny, playful, cheerful attitude and have a great day. Choose your attitude to be happy & world famous rather than being ordinary. Keep your menu of the day ☺ instead of ☹.
2) **Have the Courage to Change :** You are lost when you lose the confidence in you.
3) **The needs of your job, your institute & you are the same :** Creativity, Passion, Flexibility and Wholeheartedness.
4) **Have Faith in the work you do :** Your workplace is not a prison, but we make it a prison by the way we choose to work. If you have created a prison, the walls are your own lack of faith in yourself. Dare to change & you will succeed.
5) **We all are Artists :** With every choice and decision taken by you, you are creating a unique work of art, something that only you can do to leave your incredible mark in this world.
6) **Never stop from learning more & growing more :** Life is hard & filled with dangers. Face and overcome them. If your learning clock is unwound, wind it up again cause you have more resources of energy in you than you've ever tapped, more talent than has been exploited, more strength than has been tested and more to give than you've ever given.
7) Remember that you have important choices to make, whatever the nature of your work may be. All you need is a little self-control & courage. Reacting abruptly & feeling like a victim is not going to solve the problem. Do not evade the problem, confront it & solve it.
8) **Love, Play & Enjoy your work :** We have just forgotten the importance of play as we have become older and more serious. Be serious about your work & still you can enjoy & have fun with the way you conduct your work. Don't get all uptight but let things flow. Be a bunch of adult kids having a good work time by doing it in a respectable manner. Get over the Monday blues. Stop saying "I'm so bored to work on Mondays" and " Ultimately it's a holiday tomorrow"
9) **Make others day :** With your playful but respectful nature, involve your customers in your work. Engage them in your activities rather than making them stand apart. Welcome others to join in your fun & create great memories for them & make their day. Don't be sarcastic to others, be a critic & reach out to them. Focusing your attention on ways to make the other persons day provides a constant flow of positive feelings. You will always be loved, adored & respected.
10) **Be Present :** Focus on the task at hand by being fully engaged in it. No one can teach you anything unless you have the desire to learn it, unless you put in total concentration and unless you get a learning experience within it by your own performance. Take time & give time to internalize the experience. It is of no use of anyone telling you something until you discover it for yourself.

**Dr. Apurv Shimpi (PT)**
Lecturer, SICOP
Inspired from the book Fish!

# Pain

Pain is defined as a Perception & not just a sensation, Whenever you are meeting Or are in separation, Or when you are out of the OT after undergoing an operation, Or just sitting, alone in depression.

It is an event found in positive correlation, to the things happening against your satisfaction, When your results do not meet your expectation, Or your teachers simply ask for justification. Pain is, at times, felt in gratification, When your demands are met at the limit of your obsession, the tears in our eyes are just an indication, to the feelings in our heart indicating our personification.

Dr. Apurv Shimpi (PT)
Lecturer, SICOP.



# काय असते

भावनांना भाषा नसते
पण नुसत्या भाषेला भावना कुठे असते...
प्रत्येक अश्रूला दु:ख असते
पण ते अश्रूच कुठे सुखाचे....
हसणाऱ्या डोळ्यात दु:ख नसते
पण मनाच्या खाईत सुख कुठे असते.
प्रत्येक किरणात जीवनाची निराशा नसते
पण जगण्याची आशा तरी कुठे असते?....

**Mrs. Swati S. Bhoite**
(O.T. Store, Pharmacist)

**आई जवळ असेपर्यंत तिची किंमत कळत नाही आणि आई गेल्यावर मात्र जगात कोणत्याच गोष्टीला किंमत उरत नाही.**

**Mrs. Swati S. Bhoite**
(O.T. Store, Pharmacist)

# अनुभव

आपल्या ओंजळीतील फुले कुणापुढेही वाहायची नसतात
डोळ्यातले अश्रु
मोत्याप्रमाणे जपायचेअसतात.
आपल्या प्रेमाचे स्नेहलबांध
दुसऱ्यांच्या दु:खात लोटायचे नसतात
जे आपले असतात त्याचे सारे अपराध
पोटात घालायचे असतात.
जे परके असतात त्यांची नाती
नाजूक खांद्यावर पेलवायची नसतात.
जिथे हक्क सांगता येतात,
तिथेच कर्तव्य जपायची असतात.
ओलावा नसलेल्या जमीनीत
आपली मुळे वठवायची नसतात.

**Kanchan G. Bhunge**

# नातं

इथंच कुणीच नसतं कुणाचं
आई वडील भाऊ बहिण
कारण नाती सांभाळता सांभाळता
अनुभवांची गाठोडी कधी जड होतात
कळतंच नाही
हलके फुलके रंगणारे शब्द
बेसुर होत जातात
प्रेमाच्या रेशीमगाठी सुद्धा
विरत जातात
एखाद्या रंग उडालेल्या
शिल्पकृतीप्रमाणे
सारेच बेरंगी होत चाललंय

**Kanchan G. Bhunge**

# Feed Back

- अपेक्षेपेक्षा जास्त छान व सोविस्कर कौटुंबीक वातावरण सारखे वाटले धन्यवाद. सर्व स्टाफ खुप मदत करणारा आहे माझ्या मते हॉस्पीटलच्या सुविधा एकदम चांगल्या आहेत. डॉक्टरांची रूग्णांविषयी आपुलकी चांगली, नर्स वॉर्डबॉय फिजीओथेरपिस्ट एकंदरीत सर्व काही उत्कृष्ट सेवा देणारे हॉस्पीटल आहे.

- I am Foreigner, I didn't fed home sick, you all are very kind, I feel at home. I got energy because of your smile ! Thank you all !

- हॉस्पीटलमधील सेवा एकदम उत्तम आहे. सर्व स्टाफ को–ऑपरेटीव्ह आहे. आभारी आहे.

- माझ्या आईच्या उजव्या पायाची जखम ३० वर्ष जुनी आहे, त्यात इतक्या कमी दिवसात फार चांगला फरक पडला अजून याच्या पेक्षा मोठी सुविधा काय असणार

- Excellent hospital. May god bless, the Doctors, nurses, physiotherapist & all staff.

- हॉस्पीटल मे सुविधा अच्छी है । सब स्टाफ के सहकार्य से पेशन्ट आधा ठीक होता है । मेंटल सपोर्ट मिलता है । घर जाने के बाद सबकी याद आएगी । Thank you all!

**A gist of Letters from our patients:-**

- **Deelip Bhatnagar** 10/10/2007 From Delhi

मला सांगण्यास खुप आनंद वाटतो की तुमचा स्टाफ – वॉर्डबॉय मावशी व क्लीनिंग स्टाफ खुप मनापासून पेशंटची सेवा करतो. दिवसभर २४ तास चांगली सेवा मिळल्याने मला आरामदायी व समाधानी वाटते.

- **Mohmad Harnani** 31/06/2007 From Kenya.

तुमच्या पूर्ण स्टाफने तसेच मावशी व वॉर्डबॉयज यांनी दिलेल्या प्रेमळ वागणूकीने, अप्रतिम सर्विसेसने, तसेच सहकार्याने मी खूप प्रभावित झालो आहे. मी त्यांचा मनपूर्वक आभारी आहे.

थोडक्यात तुमचे हॉस्पीटल हे ‘‘ सुर्वर्णहार ’’ असून त्यातील संपूर्ण स्टाफ हिऱ्यांप्रमाणे चमकणारा आहे.

- **Agrawal Sharadkumar** From Dhulia

येथील सर्व स्टाफने मला चांगली वागणूक देऊन माझ्यावर वेळोवेळी रात्री अपरात्री कधीही तत्पर सेवा केली. त्यामुळे मी त्याचं आभारी आहे.

# Practical Experience of knee Replacement

I 81 years old O. P. Gupta with heart problem and heavy weight of 90-k.g. fell every much relaxed and extreme pleasure to get rid of my badly affected both the knees. I was very much mentally disturbed and frustrated from my life due to acute painful disease.

But now on the contrary I feel my self undesirable satisfaction and much relief after under going knee replacement at the Sancheti Orthopaedic Hospital Pune.

I also took the best impression about the Hospital where all sorts of facilities and amenities were available with affordable expense according to the status of patients.

The most important fact is that all the staff members of the hospital from bottom to top are vary much sympathetic, sincere, co-operative and loyal towards the patients.

Thus the whole credit of my acute painful problem of both the knees goes to aforsaid Hospital where & I was admitted and operated during the last five month (from June 07 to oct.07)

In the end I felt my self very much thankful and grateful to the most efficient management of the Hospital as a whole.

# Simply Jokes

Man : Is there any way for long life?

Dr : Get Married.

Man : Will it help?

Dr : No, but the thought of long life will never come.

•••

Why do couples hold hands during their wedding?

It's a formality just like two boxers shaking hands before the fight begins!

•••

Wife : Darling today is our anniversary, what should we do?

Husband : Let us stand in silence for 2 minutes.

•••

It's funny when people discuss Love Marriage vs. Arranged.

It's like asking someone, if suicide is better or being murdered.

•••

It is difficult to understand GOD.

He makes such beautiful things as **WOMEN** and then he turns them into **WIVES !**

•••

A man, who surrenders when he's wrong, is **"HONEST"**,

A man who surrenders when not Sure, is **"WISE"**.

A man who surrenders even if he's Right, is a **"HUSBAND"**.

•••

Before marriage, a man will lie awake all night thinking about something you say.

After marriage, he'll fall asleep before you finish.

•••

There's a way of transferring funds that is even faster than electronic banking. It's called marriage.

•••

Aadmi shaddi kyon karta hai?

Take woh Marne ke bad Swarg jaye to achcha feel kare aur agar Nark jaye to homely feel kare,.

•••

Why do Bride & Groom exchange varmaala during wedding ?

To tell each other affectionately.... Sweetheart U R Dead!

•••

Different Phases of a man:

After engagement: Superman

After marriage : Gentleman

After 10 years: Watchman

After 20 years; Doberman

•••

There is only one perfect child in the world and every mother has it.

There is only perfect wife In the world and every neighbour has it.

•••

Prospective husband : Do you have a book called 'Man, the Master of Women'?

Salesgirl : The fiction department is on the other side, sir.

•••

Man receives telegram : Wife dead-should be buried or cremated ?

Man : Don't take any chances. Burn the body and bury the ash.

**Ms. Supriya Paradkar**
SIOR

# Our Shining Stars for this year (2007 - 08)

## Best Resident Doctors Award



**Dr. Sachin Kad**



**Dr. Shahrukh Dhotiwala**

## Best Employees Award



**Ms. Rupa Deshmukh**
Admin. Dept.



**Ms. Uma Vishwakarma**
Pathology Dept.



**Ms. Sarita Kurhade**
Medilinks



**Ms. Milan Koregaonkar**
Nursing Dept.



**Ms. Lata Memane**
Operation Dept.



**Mr. Vishwas Satwekar**
College of Dr. Physiotherapy



**Ms. Priya Kadam**
DHM College



**Ms. Shobha Bhalerao**
Housekeeping Dept.

## Distinctive Award



Mrs. Aparna Bidve

## Appreciation Award



Mr. Pravin Padmashali

## Sabhashki Award



Mr. Sunil Tiwari

## Excellence Award



Ms. Nirmala Kamath

## Appreciation Award



Ms. Supriya Paradkar